SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
BARR. BALASAHEB KHARDEKAR KNOWLEDGE RESOURCE CENTER
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र
Phone (Direct) : +91-0231- 2609204, Office : 2609205, Deputy Librarian : 2609210, 2609421
Asst. Librarian : 2609212 Stack : 2609212, Circulation : 2609210,
Periodical : 2609208, Archival : 2609336, Reference : 2609209
Website : URL : http://www.unishivaji.ac.in/library E-mail : subbkl@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

Ref. No. : SU/BBKKRC/2026-27/
शि.वि./बॅ.बा.ख.ज्ञा.स्रो.कें./1292

Date : 03 NOV 2026
दिनांक :

प्रति,

मा. प्रकाशक, विक्रेते इ.

महोदया / महोदया,

आपणास माहितच आहे की, दिक्षांत समारभांचे औचित्य साधून बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर प्रतिवर्षी ग्रंथमहोत्सवाचे भव्य आयोजन करते. सलग १९ व्या वर्षी आम्ही हा उपक्रम राबवत आहोत.

या वर्षीचा ग्रंथमहोत्सव हा दिनांक २६ -११ -२०२६ ते २७ -११ -२०२६ या दरम्यान घेण्याचे नियोजन केलेले आहे. दि. २७-११ -२०२६ रोजी शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा दिक्षांत समारंभ माननीय श्री. जिष्णू देव वर्मा, महाराष्ट्राचे राज्यपाल आणि कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. मा. कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथदिंडी पालखीचे आयोजनही या दरम्यान होणार आहे. या ग्रंथमहोत्सवात सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, ग्रंथपाल व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. तेंव्हा हा 'ग्रंथमहोत्सव २०२६ ' भव्य स्वरूपात आयोजित होईल यात शंकाच नाही.

याच बरोबर प्रकाशकांचा / पुस्तक विक्रेत्यांचा खप वाढणेकामी बॅ. बा. ख. ज्ञान स्त्रोत केंद्राने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २४० संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षकांना / ग्रंथपालांना 'शिक्षकांची वैयक्तीक ग्रंथालय योजना (TPLS)' अंतर्गत व त्यांच्या महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी पुस्तक खरेदी बाबत एका विशेष परिपत्रकाने अगोदरच कळविण्यात आलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मी आपणा सर्वास 'ग्रंथमहोत्सव २०२६ ' मध्ये आपला स्टॉल आरक्षित करण्याची आग्रहाची विनंती करीत आहे. या संदर्भात आपल्याला अधिकची माहिती पाहिजे असल्यास ई-मेलद्वारे acquisition.krc@unishivaji.ac.in / subbkl@unishivaji.ac.in तसेच दूरध्वनी क्र. - ०२३१/२६०९२०४, ०२३१/२६०९२०५ द्वारे मिळेल.

अधिकच्या माहितीसाठी कृपया ग्रंथालयातील खालील कर्मचा-यांशी संपर्क साधावा.

अ. क्र.	नांव	विभाग	फोन नं.
१.	श्रीमती. एस. एस. पाटील	वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक,ग्रंथ उपार्जन विभाग	०२३१/२६०९२०५
२ .	डॉ. डी. एस. गुरव	वरिष्ठ ग्रंथालयसहाय्यक,नियतकालिक विभाग	०२३१/२६०९२०८
३ .	श्री. सी. एन. गुरव	वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक, स्टॅक विभाग	०२३१/२६०९२१२

सोबत स्टॉल आरक्षित करण्याबाबतचे नियम व अटी यांची यादी जोडलेली आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित,

03-11-26

डॉ. डी .बी. सुतार

E.4.R.104.1 - SGST - 180/-
E.4.R.104.2 - CGST - 180/-
360/-

स्टॉल आरक्षित करण्याबाबतचे नियम व अटीः-

१) जागाभाडे रक्कम रू. २,०००/- + रू. ३६०/- GST (18%) असे मिळून एकुण रु. २,३६०/- फक्त तीन दिवसासाठी राहील. सदर रक्कम ऑनलाईन सेवेमार्फत https://paysuk.unishivaji.ac.in/BWaysReceipt/auth/login/simple या संकेतस्थळाखाली आपला स्वतःचा लॉगीन नेम व पासवर्ड तयार करून दिनांक २५-११-२०२६ पर्यंत A.42.R.6 या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली विद्यापीठात भरावी. online पैसे भरल्यानंतर तसा e-mail कार्यालयाच्या माहितीसाठी acquisition.krc@unishivaji.ac.in / subbkl@unishivaji.ac.in या ॲड्रेसवर अथवा खाली दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा. विहीत मुदतीपर्यंत पैसे न भरल्यास स्टॉलचा तावा देण्यात येणार नाही.

२) स्टॉल ची संख्या मर्यादित (३०) असुन **'प्रथम येणा-यास प्रथम संधी'** या तत्वानुसार दि. २५-११-२०२६ पर्यंत रक्कम भरणाऱ्या व्यक्तिंनाच स्टॉल लावणेसाठी आमंत्रित करण्यात येईल.

३) एकदा जागाभाडे म्हणुन भरलेले पैसे कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाहीत.

४) जागाभाडे अंतर्गत प्रत्येक स्टॉलला ३ टेबल व ३ खुर्च्याचा पुरवठा करण्यात येणार असून, अधिकचे फर्निचर साहित्य उदा. टेबल्स, खुर्च्या, इलेक्ट्रॉनिक पॉइंटस, लाईटस्, फॅन, टेबल क्लॉथ इ. हवे असल्यास तसे आगाऊ कळविल्यास नियमाप्रमाणे त्याचे अधिकचे पैसे भरून अधिकचे साहित्य घेता येईल.

५) पुस्तक विक्रेते / स्टॉल धारक स्वतःचे रॅक, कपाट व फर्निचर साहित्य मांडणीसाठी आणू शकतात.

६) दिलेल्या प्रत्येक स्टॉलची जबाबदारी ज्या त्या स्टॉल धारकाने घ्यावी. स्टॉल मधील कोणतेही साहित्य विद्यापीठाच्या अधिविभागात /इमारतीत /खोल्यांमध्ये ठेवता येणार नाही.

७) विद्यापीठामार्फत विद्यापीठ सुरक्षा स्टॉल भोवती पुरवण्यात येईल.

८) ग्रंथमहोत्सव दरम्यान स्टॉल धारकांनी त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यापीठ गेस्टहाउस मध्ये चार्जेस भरून अथवा इतरत्र स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच जेवणाची व्यवस्था स्टॉल धारकांच्या आवश्यकतेप्रमाणे पुर्वसुचना दिल्यास योग्य ते चार्जेस घेऊन गेस्टहाउस विभागामार्फत केली जाईल. त्यासाठी त्यांनी तेथे संपर्क साधावा. (गेस्टहाउस फोन नं. - ०२३१/२६०९२६८)

९) कोणत्याही नैसर्गिक आपत्तीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१०) ड्रॉ पध्दतीने स्टॉल चे नंबर काढण्याबाबत सर्व निमंत्रित स्टॉलधारकांची एकत्रित बैठक दि. २५-११-२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता बॅ. बा. ख. ज्ञान स्रोत केंद्रात घेण्यात येईल. एकदा ड्रॉ पध्दतीने देण्यात आलेला स्टॉल क्रमांक नंतर बदलता येणार नाही. सर्व स्टॉल धारकांनी २५/११/२६ तारखेलाच स्टॉल चा तावा घेऊन त्याचदिवशी मांडणी करणे बंधनकारक राहील. दि. २६/११/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. त्यापूर्वीच वरीलप्रमाणे दि. २५-११-२०२६ रोजी रात्री स्टॉल मांडणी करावी.

११) ग्रंथप्रदर्शन स्टॉल बंद झाल्यानंतर स्टॉल धारकांना रात्री स्टॉल मध्ये थांबता येणार नाही.

१२) पुस्तक विक्रीबाबतच्या काही योजना, कमिशन विशेष सवलत योजना असल्यास विक्रेते विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी थेट संपर्क करू शकतात. महाविद्यालयांची यादी विद्यापीठाच्या पुढील संकेत स्थळावर उपलब्ध आहे

https://www.unishivaji.ac.in/bcud/college-list

१३) ग्रंथमहोत्सव- २०२६ संबधी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील. आपण आपले बुक स्टॉल त्वरीत नोंदवावेत ही नम्र विनंती.

१४) ग्रंथमहोत्सवाच्या शेवटच्या दिवशी रात्री १०.०० पर्यंत स्टॉल धारकांनी स्टॉल ची जागा रिकामी करून देणे बंधनकारक राहील.

१५) खाद्यपदार्थांचे स्टॉल लावणाऱ्या स्टॉलधारकांनी वापरून झालेल्या रिकाम्या कागदी प्लेटस, चमचे, कप इ. वापरलेले साहित्य इतरत्र न फेकता बॉक्समध्ये / प्लास्टिक बादल्यांमध्ये ठेवणे बंधनकारक आहे. ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवण्याची दक्षता घ्यावी. स्टॉल बंद करतेवेळी परिसर स्वच्छ ठेवून सहकार्य करावे.

- ग्रंथप्रदर्शनाचा कालावधी : दि. २६-११ -२०२६ ते २७ -११ -२०२६
- प्रदर्शनस्थळावरील स्टॉलचे भाडे : रु. २३६०/- प्रति स्टॉल दोन दिवसांकरिता
- स्टॉल वाटपाकरिता बैठकीची वेळ : दि.२५-११-२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता
  स्थळ : बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र (ग्रंथालय),
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर
- Online payment URL :
  https://paysuk.unishivaji.ac.in/BWaysReceipt/auth/login/simple
  (नवीन नोंदणीकरिता स्वतः चे लॉगिन व पासवर्ड निर्माण करा.)

****

For additional information, kindly contact the following Library staff members-

1) Smt. S. S. Patil, Senior Library Assistant : 0231/2609205
2) Dr. C. N. Gurav, Senior Library Assistant : 0231/2609212

- Date of Exhibition : 26 -11-2026 to 27-11-2026
- Venue Spot Rate : Rs. 2360/- per stall for 2 days
- Online payment URL :
  https://paysuk.unishivaji.ac.in/BWaysReceipt/auth/login/simple
  (Create your own login name & password for new registration)
- Date and Venue of Stall Allotment Meeting: 25-11-2026 at 1.00 p.m., Barr. B. K. Knowledge Resource Centre, Shivaji University, Kolhapur- 416004